MHYA110017262022

नि. मु.नं. ९९/२०२२

## नि.क्र. १९ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादी याने दाखल केलेला दावा चुकीच्या वादीने दाखल केला असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १ व आदेश १ नियम १० (१)(२) नुसार रद्द करण्याच्या विनंतीसह दाखल केला आहे. वादी याने नि.क्र. २४ लगत म्हणणे मांडुन अर्जास प्रखर विरोध दर्शवला.

०२. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादी याने दावा दत्ता वामन संगेवार व दत्ता माधव हिंगमिरे या दोन्ही नावाने दाखल केला आहे. वादी अशा दोन आडनावाचा वापर करुन दावा दाखल करु शकत नाही. वादीने रे.मु.नं. १५/२०१८ मध्ये दत्ता महादु हिंगमिरे असे नाव नमुद केले आहे. शेत स.नं. १०/१अ च्या फेरफारमध्ये वादीचे नाव दत्ता माधव हिंगमिरे असे नमुद आहे. तसेच, मतदार ओळखपत्र, शिधापत्रीका ही दत्ता माधव हिंगमिरे या नावाने असल्याने दत्ता वामन संगेवार असे नाव नमुद करुन वादीस दावा दाखल करता येणार नाही. त्यामुळे वादीने चुकीच्या नावाने दावा दाखल केल्याने दावा रद्द करण्यात यावा. प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांनी अर्जाप्रमाणे आपला युक्तिवाद नोंदवला. प्रतिवादी याने नि.क्र. २१ लगत दस्तऐवज दाखल करुन त्यावर आपल्या अर्जाची भिस्त ठेवली. ती दस्ताऐवज पुढीलप्रमाणेः

१. मौजे विठ्ठळ–१ शे.स.क्र. ५/१ चा ७/१२ उतारा सन १९७९–८० ते १९८६–८७, २. ७/१२ उतारा सन १९८७–८८ ते १९९७–९८, ३. ७/१२ उतारा सन १९९८–९९ ते २००७–२००८, ४. ७/१२ उतारा सन २००८–०९ ते २०१४–१५, ५. दि.मु.नं. १५/२०१८ ची नि.क्र. १ ची नक्कल, ६. दि.मु.नं. १५/२०१८ ची नि.क्र. १३ ची नक्कल, ७. दि.मु.नं. १५/२०१८ ची नि.क्र. २९ ची नक्कल व ८. दि.मु.नं. १५/२०१८ ची नि.क्र. ३२ ची नक्कल.

०३. वादी याच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज विनाकारण विलंब व्हावा या उद्देशाने दाखल केला आहे. वादीने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. वादीने आपल्या बचावाची भिस्त नि.क्र. २३ सोबत दाखल केलेल्या नोंदणीकृत दत्तक पत्रावर व नोंदणीकृत मृत्यु पत्रावर ठेवली. वादी यांचे विधीज्ञ श्री. गाजेवार यांनी युक्तिवादामध्ये वादी यास वामन नारायण संगेवार यांनी नोंदणीकृत पत्राच्या आधारे दत्तक घेतलेले असल्यामुळे वादी याचे नाव दत्ता वामन संगेवार उर्फ दत्ता माधव हिंगमिरे असे असल्याचे नमुद करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखची पाहाणी केली. अर्ज व म्हणणे वाचले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(१)(२) चे वाचन कले. न्यायालयास दाव्याच्या कोणत्याही टप्यास वादी म्हणुन अयोग्य व्यक्तीस जोडले गेले असल्यास त्याचे नाव दाव्यातुन कमी करण्याचा अथवा आवश्यक पक्षकार असल्यास दाव्यामध्ये जोडण्याचा आदेश करता येतो. प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी यांनी वादी हा चुकीच्या नावाने दावा करत असल्याने दावाच रद्द करण्याबाबत विनंती कली आहे. अशी विनंती करण्याची तरतुद दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(१)(२) दिसुन येत नाही. प्रकरणामधील एकमेव वादी याने आपले नाव उर्फ म्हणुन नमुद केले आहे. वादी याने दावा हा कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रकरणामध्ये वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत त्याच्या ताब्यामध्ये आहे आणि ती दत्तक पुत्र म्हणुन मृत्यु पत्रान्वये मिळालेली आहे. प्रस्तूत प्रकरणाची वादांकित बाब मनाईहुकूम असल्याने वादी ही एक व्यक्ती म्हणुन न्यायालयासमोर दाद मागण्याकरीता दावा दाखल करुन आलेली आहे. अशा परिस्थितीत नोंदणीकृत दत्तक पत्र, मृत्यु पत्र अथवा ताब्याविषयीचा वाद हा चौकशीअंती व पुराव्याअंती न्यायनिर्णीत होवु शकतो. आजच्या टप्यास वादी याचे नावाच्या आधार दावा रद्द करणे न्यायोचीत होत नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यावरुन मी खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी याने दाखल केलेला नि.क्र. १९ लगतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHAIKH AARISH SHAIFODDIN
Date: 2022.10.20 17:25:59 +0530

(ए.एस.शेख)

दिनांकः २०/१०/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरखेड